# आरोग्यदीप-२०२३ दिवाळी अंक प्रकाशन

राष्ट्रीय शिक्षण मंडळ संचलित आयुर्विद्या मासिकाच्या 'आरोग्यदीप २०२३' या दिवाळी अंकाचे प्रकाशन गुरुवार दि.२६ ऑक्टोबर २०२३ रोजी सुप्रसिद्ध लेखिका मा.श्रीमती मंगला गोडबोले यांच्या हस्ते टिळक आयुर्वेद महाविद्यालयाच्या एन.आय.एम.ए. सभागृहात झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रीय शिक्षण मंडळाचे अध्यक्ष व आरोग्यदीपचे प्रधान संपादक मा.डॉ.दि.प्र.पुराणिक हे होते.व्यासपीठावर सचिव- डॉ.राजेंद्र हुपरीकर,प्राचार्य - डॉ.सरोज पाटील उपस्थित होते.आयुर्विद्या मासिकाच्या सचिव डॉ.विनया दीक्षित यांनी प्रास्ताविक व उपस्थितांचे स्वागत केले.व्यासपीठावरील मान्यवरांचे स्वागत व ओळख आयुर्विद्या समितीचे सदस्य डॉ. सरोज पाटील यांनी केले.आयुर्विद्या समितीचे सदस्य डॉ.सदानंद देशपांडे, डॉ.संगीता

साळवी यांच्या हस्ते व्यासपीठावरील मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. दिवाळी अंकाच्या कार्यकारी संपादक डॉ.अपूर्वा संगोराम यांनी या दिवाळी अंकाच्या निर्माणाविषयी, लेख व इतर सदरांविषयी सविस्तर माहिती दिली.प्रमुख अतिथी मा. मृणालिनी चितळे यांनी उपरोक्त अंकाचे कौतुक केले आणि स्वास्थ्यरक्षणासाठी मानसिक स्वास्थ्य कसे जपावे याविषयी सोदाहरण मार्गदर्शन केले.अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना डॉ.दि.प्र.पुराणिक यांनी आयुर्विद्या मासिकाच्या आत्तापर्यंतच्या कार्याचा आढावा घेतला तसेच आयुर्विद्या इंटरनॅशनल, इ-आयुर्विद्या,इत्यादी आयुर्विद्याच्या सर्व प्रकाशनासाबंधी सविस्तर माहिती दिली. आयुर्विद्या समिती सदस्य डॉ. अभय इनामदार यांनी आभार प्रदर्शन केले.याप्रसंगी आरोग्यदीप दिवाळी अंकाच्या कार्यकारी संपादक डॉ.अपूर्वा संगोराम, आरोग्यदीपचे प्रिंटर श्री.दिनेश धडफळे व लेखकांचे,उपस्थित जाहिरातदारांचे प्रातिनिधिक सत्कार मा.मृणालिनी चितळे व व्यासपीठावरील

मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन आयुर्विद्या समिती सदस्य व महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.मिहीर हजरनवीस यांनी केले.डॉ.अभय इनामदार यांनी उपस्थित मान्यवर आणि उपस्थितांचेआभार व्यक्त केले.

दिवाळी अंकातील ज्येष्ठ व तज्ञ मान्यवरांचे लेख पाहून उपस्थित मान्यवरांनी अंकाची प्रशंसा केली. उपरोक्त दिवाळी अंक रसिक साहित्य,अक्षरधारा इ. ठिकाणी व Online digidiwali येथे विक्रीसाठी उपलब्ध आहे.